# ♦ उपयोजित लेखन

## १. पत्रलेखन

पत्रलेखन ही कला आहे. आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे तसेच आपल्या भावना/विचारांचे चांगल्या भाषेत संक्रमण करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

तुम्ही मागील वर्षीही 'पत्रलेखन' या घटकाचा अभ्यास केलेला आहे. ते पत्रलेखन तुम्ही पारंपरिक पद्‌धतीने करत होतात. आता तुम्ही तंत्रज्ञानयुगात वावरत आहात. संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांद्‌वारे तुमची तंत्रज्ञानाशी गट्टीही झाली आहे.

'फोन'चा वापर वाढल्यानंतर पत्रलेखनाची गरज काहीशी कमी झालेली आहे. असे असले तरी अनौपचारिक पत्रात आपल्या भावना शब्दांत प्रभावीपणे व्यक्त करता येणे, हे आवश्यक कौशल्य आहे. तसेच औपचारिक पत्रासाठी आपले म्हणणे, विचार, मागणी, तक्रार, विनंती इत्यादी गोष्टी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचवणे, हे आवश्यक कौशल्य आहे. आजही पत्रलेखन ही कला आत्मसात करणे आवश्यक आहे. यापुढे तंत्रज्ञानाच्या लेखनपद्‌धतीने आपले लेखन कौशल्य प्रकट व्हायला हवे.

पत्रलेखनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. यापुढील काळात तुम्हांला मेल पाठवण्याचे तंत्र अवगत करावे लागणार आहे. म्हणूनच या वर्षी आपण पत्राचे प्रारूप हे नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्‌धतीनुसार लक्षात घेणार आहोत.

**यावर्षी आपण खालील पत्रप्रकारांचा अभ्यास करणार आहोत.**

**पत्रलेखन**

- **अनौपचारिक**
  - **कौटुंबिक**
    जवळच्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला पाठवले जाणारे पत्र
- **औपचारिक**
  - **मागणी, विनंती**
    कार्यालयीन व व्यावसायिक पत्र

| औपचारिक | अनौपचारिक |
|---|---|
| (१) प्रति, लिहिल्यानंतर व्यक्तीचा हुद्दा योग्य तो लिहिणे.<br>(२) पत्राचा विषय लिहिणे.<br>(३) अचूक शब्दांत नेमका आशय मांडणे.<br>(४) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे. | (१) व्यक्तीचा उल्लेख योग्य/नात्याप्रमाणे/ सन्मानपूर्वक करणे.<br>(२) व्यक्तीचे क्षेमकुशल विचारणे.<br>(३) भावना प्रभावी शब्दांत मांडणे.<br>(४) नात्यातील जिव्हाळ्यानुसार विस्तृत लेखन करणे.<br>(५) पत्राचा विषय लिहिण्याची गरज नाही.<br>(६) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक. |

[टीप – पत्राला उत्तर मिळण्यासाठी पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक ठरते. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आवश्यकता नाही. (ई–मेलसाठी पाकीट नसते.)]

## पत्राचे प्रारूप नमुना

दिनांक ———

प्रति, ———

मानननीय ————— ,

—————

विषय : ———

महोदय,

————————————

मुख्य मजकूर

आपला/आपली

—————

पत्ता

—————

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

## पत्रलेखन नमुना कृती–१

- खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

*'झाडे लावा... झाडे जगवा'*

दिनांक ५ जून

**हिरवाई ट्रस्ट, तळेगांव दाभाडे**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त

रोपांचे मोफत वाटप

संपर्क– हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगांव दाभाडे
hirwaitrust@gmail.com

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

- शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.
- चांगल्या उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

## पत्रलेखन नमुना कृती–२

- खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

अ आ इ ई

***मराठी सुलेखन वर्ग***

विनय ॲकॅडमी तर्फे

कालावधी १ मे ते ३१ मे

सुलेखन वर्गाचे आयोजन

संपर्क :
श्री. विनय गायकवाड
२, सोमवार पेठ, कराड
marathisulekhan@gmail.com
भ्रमणध्वनी– ८८४४००१७००

माफक फी

विद्यार्थी या नात्याने या वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.

# २. सारांश लेखन

'आपले म्हणणे थोडक्यात सांगा', हे आजच्या धावपळीच्या युगातले परवलीचे वाक्य आहे. एखाद्या विस्तृत लेखनाला त्याचा संपूर्ण आशय लक्षात येईल अशा पद्धतीने संक्षिप्त रूप देणे हे महत्त्वाचे कौशल्य आहे. हे कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने 'सारांश लेखन' या घटकाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

**सारांश लेखनाच्या पायऱ्या :**

(१) दिलेल्या परिच्छेदाचे वाचन.

(२) परिच्छेदातील आशयाचे आकलन होणे.

(३) मध्यवर्ती विचार जाणून घेणे.

(४) समजलेला विचार स्वत:च्या शब्दांत थोडक्यात मांडणे.

(**टीप–** कमीत कमी शब्दांत सारांश लिहिणे व त्यातून परिच्छेदातील आशयाचा पूर्ण अर्थ प्रतिबिंबित होणे महत्त्वाचे आहे.)

**कृतिपत्रिकेसाठी–**

(१) सारांश लेखन उतारा १०० ते १२० शब्दांचा असेल. (२) दिलेल्या परिच्छेदाचा थोडक्या (कमीत कमी) शब्दांत सारांश लिहिणे अपेक्षित आहे. (३) परिच्छेदाच्या सारांशातून संपूर्ण आशय लक्षात येणे अपेक्षित आहे. (४) सारांश लेखनाची मध्यवर्ती कल्पना स्वत:च्या शब्दांत मांडणे अपेक्षित आहे. (५) परिच्छेदाचे वा सारांशाचे शब्द मोजून नोंद करणे आवश्यक नाही.

**सारांश लेखन नमुना कृती**

*** खालील उताऱ्याचे सारांश लेखन करा.**

मुकुल डे यांच्यासारखा आज जागतिक कीर्ती मिळवलेला चित्रकार शाळेतल्या गणित, व्याकरण वगैरे विषयांत अजिबात रमत नसे. गुरुदेवांनी त्याच्या हाती रंग, कागद आणि ब्रश दिले आणि सांगितले, ''यात तुला आवड आहे ना, मग चित्रे काढ.'' शांतिदेव घोषांना सुरांचे आणि नृत्याचे प्रेम. त्यांना तंबोरा आणि घुंगरू दिले. निसर्गात वृक्षवल्ली जशा स्वधर्माने वाढतात तसे मानवी जीवन वाढले पाहिजे.नारळाच्या झाडाकडून आंब्याची अपेक्षा केली नाही. भेंडीच्या रोपाला केळी का लटकत नाहीत याची चिंता केली नाही. एकदा रोप कसले आहे हे ओळखल्यावर मग त्याला योग्य ते खतपाणी देऊन ते कसे फुलेल आणि फळ धरील ते मात्र पाहिले. त्याप्रमाणे जोपासले. सगळ्या झाडांना पाणी, ऊन आणि माती हवीच. त्याप्रमाणे किमान आवश्यक शिक्षण देऊन ज्याची जिथे गती त्या क्षेत्रात त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ कशी होईल ते पाहिले. म्हणूनच शांतिनिकेतनात मुलामुलींची भरती प्राथमिक शाळेपासून करण्याचा गुरुदेवांचा आग्रह असे.

***निसर्गातील वृक्षवेली स्वधर्माने वाढतात त्याप्रमाणे विद्यार्थ्याने वाढावे अशी गुरुदेवांची इच्छा असल्यामुळे त्यांनी प्रसिद्ध चित्रकार मुकुल डे यांना चित्रकलेकडे व नृत्य प्रेमी शांतिघोषांना संगीत कलेकडे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. व्यक्तीची आवड व योग्यता ओळखून त्याला योग्य शिक्षण दिले की त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ होते.***

# ३. जाहिरात लेखन

आजच्या स्पर्धेच्या युगाचा 'जाहिरात' हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या यशस्वितेवर उत्पादनाच्या विक्रीचा आलेख ठरतो, म्हणून एखाद्या उत्पादनाची जाहिरात करणे ही अत्यंत सृजनशील कला आहे आणि ती आत्मसात करणे हे व्यवसायाच्या यशाचे महत्त्वाचे तंत्र आहे.

आजच्या संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट व भ्रमणध्वनी (मोबाईल) यांच्यातील क्रांतीमुळे जाहिरात क्षेत्राची कक्षा अधिक विस्तारते आहे.

लोकांच्या मनात उत्पादनाबाबत आवड निर्माण करणे, त्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हा जाहिरातीचा प्रमुख उद्देश असतो.

- **जाहिरात लेखन करताना खालील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.**

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्त्वाचे माध्यम भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्त्वाची ठरते.

(१) कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय हे उत्तम जाहिरातीचे सूत्र आहे.
(२) जाहिरातीकडे लक्ष वेधले जाईल अशी लक्षवेधी शब्दरचना असावी.
(३) कशाची जाहिरात आहे हे ठळकपणे व आकर्षकपणे नमूद करावे.
(४) आलंकारिक, काव्यमय, प्रभावी शब्दांचा वापर करून जाहिरात अधिक आकर्षक करावी.
(५) जाहिराती तयार करताना समर्पक व लक्षवेधी भाषेला महत्त्व असावे.
(६) ग्राहकांची बदलती आवड, सवयी, फॅशन्स व गरज यांचे प्रतिबिंब जाहिरातीत दिसावे.
(७) जाहिरातीमधील उत्पादनाची गुणवत्ता महत्त्वाची असते, त्यामुळे सवलतीचा उल्लेख असणे आवश्यक नाही.
(८) जाहिरातीमध्ये संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क क्रमांक (मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

**✻ कृतिपत्रिकेमध्ये –** (१) जाहिरात पेनने लिहावी, पेन्सिलचा वापर करू नये.
(२) चित्र काढण्याची आवश्यकता नाही.

**जाहिरात लेखनाच्या मूल्यमापन कृती**

- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन करणे.

या व्यतिरिक्त वेगळ्या पद्धतीने, सृजनशीलतेने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील, वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.

## जाहिरात लेखन नमुना कृती

**(अ) खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

'आरोग्यम् धनसम्पदा'

**वाळके शक्ती व्यायामशाळा**

**प्रो. विशाल वाळके यांची व्यायामशाळा**
**योगासने व व्यायाम हीच आरोग्याची गुरुकिल्ली**

**वेळ**
**सकाळी ५ ते १०**
**सायं ५ ते ९**

**आमची वैशिष्ट्ये**

* वातानुकूलित प्रशस्त जागा * सोईस्कर वेळा
* आधुनिक सामग्री * तज्ज्ञ प्रशिक्षक

**संपर्क पत्ता –** वाळके शक्ती व्यायामशाळा, 'प्राजक्त' हिल टॉप रोड, अमरावती १४

**कृती सोडवा–**

(१) व्यायामशाळेचे व्यवस्थापक – ☐

(२) व्यायामशाळेच्या ब्रीदवाक्याचा अर्थ – ☐

(३) व्यायामशाळेची वैशिष्ट्ये – ☐ ☐ ☐ ☐

(४) जाहिरातीतून मिळणारा संदेश– ☐ ☐

**(आ) दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन**

**आईस्क्रीम पार्लर**

- **वरील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**

**(इ) शब्दांवरून जाहिरात लेखन :**

**प्रवासी बॅग्ज, मजबूत, सुंदर रंग**
**ग्राहक समाधान**

- **वरील शब्दांचा वापर करून जाहिरात तयार करा.**

# ४. बातमी लेखन

आजचे युग हे माहितीचे युग आहे. तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे यांच्यामुळे जग खरेच जवळ आले आहे. जगात कुठेही घडलेल्या घटना, त्याची अचूक माहिती आपल्याला घरात बसून वर्तमानपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन या प्रसारमाध्यमांद्वारे सविस्तर कळते. रोजच्या जीवनातील अगदी **'जलवाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे उद्या शहराचा पाणीपुरवठा बंद राहील'** यांसारख्या आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित बातम्यांपासून **'भारताकडून क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी'** अशा राष्ट्रीय स्तरावरील महत्वाच्या बातम्यांपर्यंत सर्व बातम्या आपल्याला कळतात. माहिती देणे, ज्ञान देणे, समाजप्रबोधन करणे, परिस्थितीची जाणीव करून देणे, हे बातमीचे प्रमुख उद्देश असतात.

थोडक्यात 'बातमी' हा आजच्या जीवनातला अविभाज्य घटक आहे आणि म्हणूनच वस्तुस्थितीचे चित्रण करणारी बातमी तयार करणे (बातमी लेखन करणे) हे आज महत्वाचे कौशल्य ठरते. बातमी घडून गेलेल्या घटनांची त्याचप्रमाणे घडणाऱ्या नियोजित कार्यांचीही होते. ज्यात काय घडले? कधी घडले? कोठे घडले? कसे घडले? कोण-कोण उपस्थित होते? या प्रश्नांची उत्तरे मिळतात, ती म्हणजे बातमी. म्हणजेच बातमी लेखनात जसे घडले तसे यथातथ्य वर्णन करायला हवे.

बातमी लेखनासाठी आवश्यक गुण- (१) लेखन कौशल्य (२) भाषेचे उत्तम ज्ञान (३) व्याकरणाची जाण (४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना (५) समग्र वाचन.

कोणत्याही घडलेल्या घटनेची बातमी तयार करताना खालील गोष्टींचे भान राखणे महत्वाचे असते.

(१) घटनेची विश्वासार्हता.
(२) तटस्थ भूमिकेतून लेखन.
(३) घटनेचा अचूक व योग्य तपशील.
(४) प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे लेखन होणे महत्वाचे.
(५) स्वत:च्या मनाची कोणतीही बाब त्यात समाविष्ट करू नये.

- **बातमी तयार करण्याचे निकष :**

(१) शीर्षक - बातमीचा मथळा हा संपूर्ण बातमीचा/घटनेचा आरसा असतो.
(२) दिनांक, स्थळ, कालावधी संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.
(३) घटना घडण्याच्या स्थितीप्रमाणे बातमीलेखनात काळाचा वापर केला जातो.
(४) जनक्षोभ वाढेल, कुणाच्याही भावना दुखावल्या जातील अशी वाक्ये/शब्द बातमीत नसावेत असे संकेत आहेत.
(५) बातमी लिहिताना प्रथम महत्वाचा मुद्दा नमूद करून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

**बातमीचे क्षेत्र**

सांस्कृतिक, क्रीडा, राजकीय, शालेय/शैक्षणिक, सामाजिक, वाङ्मयीन, वैद्यकीय, वैज्ञानिक, दैनंदिन घटना या घटकांच्या संदर्भात घडलेल्या घटनांच्या बातम्या तयार होतात.

- **बातमी तयार करणे - मूल्यमापन कृती :**

(१) दिलेल्या घटनेवर बातमी तयार करणे.
(२) दिलेल्या सूचक शब्दांवरून बातमी तयार करणे.
(३) कार्यक्रमाची बातमी तयार करणे.

# बातमीलेखन

## नमुना कृती

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**
  **शहराच्या प्रदूषण पातळीत वाढ.**

आमच्या वार्ताहराकडून | **जनविकास** | दिनांक : २० नोव्हेंबर

### शहराच्या प्रदूषण पातळीत वाढ

काल (१९ नोव्हेंबर) दिवाळीतील लक्ष्मीपूजनानंतर शहराच्या प्रदूषण पातळीत ५० टक्क्यांनी वाढ झाल्याची नोंद झाली. आमच्या प्रतिनिधींनी काही जबाबदार नागरिकांची भेट घेतली. नागरिकांनी आपल्या प्रतिक्रियांमध्ये नाराजी व चिंता व्यक्त केली. प्रदूषणामुळे नागरिकांच्या स्वास्थ्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, सण साजरे करण्याबाबत जनतेचे प्रबोधन व्हायलाच हवे, महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याने याची गंभीर दखल घ्यायला हवी, कायद्यातील तरतुदीसंबंधीही विचार व्हायला हवा, अशा प्रतिक्रिया सर्वांनीच आमच्या प्रतिनिधींकडे नोंदवल्या.

- **खालील शीर्षकावरून बातमी तयार करा.**

शाळेत वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम,
वनाधिकारी मा. श्री. शशिकांत राव यांच्या उपस्थितीत संपन्न.

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**

रेल्वे प्रवासात प्रवासी नागरिकांजवळ स्वओळखपत्र असणे अनिवार्य. (आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, इलेक्शन कार्ड यांपैकी कोणतेही एक.)

# ५. कथालेखन

कथा ऐकणे व सांगणे हा आबालवृद्धांच्या आनंदाचा विषय आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती, नवनिर्मिती व सृजनशीलतेला वाव देणारा हा विषय आहे.

'कथ्यते इति कथा!' म्हणजेच सांगितली जाते ती कथा. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथा ही आपल्या कल्पनेने, विचाराने, सृजनशीलतेने रचली जाते. ती पूर्णत: काल्पनिक किंवा सत्यघटनेवर आधारित असूनही कथेच्या रूपात मांडली जाऊ शकते. कथेतून आनंद मिळतो त्याप्रमाणे कथा विचारप्रवर्तकही असतात. कथेतून आनंदाबरोबरच विचारांनाही दिशा मिळते. कथाबीजाच्या विषयाला पात्र, घटना, तर्कसंगत विचार यांनी फुलवणे हे लेखन कौशल्य आहे. लेखनकौशल्य विकसित करणे हा कथालेखन घटकाच्या अभ्यासाचा हेतू आहे.

- **उत्तम कथालेखनासाठी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक ठरते.**

(१) कथेला योग्य शीर्षक द्यावे. (तात्पर्य लिहिण्याची आवश्यकता नाही.)

(२) शीर्षकावरून कथेच्या विषयाची (कथाबीजाची) कल्पना यायला हवी.

(३) शीर्षक म्हणून सुविचार, म्हण असावी असे बंधन नाही.

(४) कथा भूतकाळात लिहावी.

(५) लेखनातील घटना, प्रसंगानुसार काळाचे योग्य भान राखले जाणे महत्त्वाचे आहे.

(६) कथेला भाषेचा, घटनांचा ओघ, कालानुक्रम असणे आवश्यक आहे.

(७) कथाबीजाला अनुसरून पात्र व त्यांचे संवाद, पात्रानुसार योग्य भाषा असावी.

(८) कथेत प्रसंगानुसार वातावरण निर्मिती करावी.

- **कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

(१) कथाबीजावरून कथालेखन.

(२) शीर्षकावरून कथालेखन.

(३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.

(४) अपूर्ण कथा पूर्ण करणे.

(अ) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे.

(ब) उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

(५) मुद्द्यांवरून कथालेखन.

[**टीप–** कथालेखनासाठी वर दिलेल्या प्रकारांपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.]

# कथालेखन

## नमुना कृती

**खालील अपूर्ण कथा पूर्ण करा.**

दिवस कधी मावळला ते कळलेच नाही त्या दिवशी! पाहुण्यांनी घर भरून गेलं होतं. आजीच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत होती. सर्वजण या निमित्ताने एकत्र आलेले पाहून आजी तृप्त झाली होती. एकमेकांशी रक्ताने व मनाने जोडलेल्या तीन पिढ्या एकत्र जमल्या होत्या. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर संध्याकाळी हास्यविनोदात, मनमोकळ्या गप्पांत सारेजण दंग होते आणि अगदी अचानक या गप्पांत एक अनोळखी आवाज ऐकू आला. 'जिजी...मी आलो ग!' खूप वर्षांनी आजीने हा आवाज ऐकला आणि .................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

- **खालील शब्दांना एकत्र गुंफून सुंदर कथा तयार करा.**

मैत्री → दप्तर → गृहपाठ → रस्ता

# ६. लेखन कौशल्य

## निबंध लेखन

स्वविचारांचे प्रकटीकरण ही क्षमता, हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी निबंध लेखन या घटकाचा अभ्यास आवश्यक असतो. निबंध लेखन म्हणजे विचारांची विषयानुरूप केलेली मुद्देसूद मांडणी.

यावर्षी आपण प्रसंगलेखन, आत्मकथन आणि कल्पनाप्रधान या निबंध लेखन प्रकारांचा अभ्यास करणार आहोत.

## निबंध लेखन

### (१) प्रसंगलेखन/अनुभवलेखन–

पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे चित्र हुबेहूब शब्दांत रेखाटणे यालाच वर्णनात्मक निबंध म्हणतात. निरीक्षणशक्ती व लेखनशैलीच्या विकासासाठी अनुभवलेखन/प्रसंगलेखन हा घटक महत्त्वाचा आहे.

**लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) प्रसंग लेखन करताना घटनांचा तार्किक विचार करावा.
(२) भाषा प्रभावी व चित्रदर्शी (हुबेहूब) वर्णन करणारी असावी.
(३) भाषा सोपी असावी. खूप आलंकारिक नसावी.
(४) लेखन प्रसंगानुरूप, संवेदनशील असावे.

**नमुना कृती**

**ज्ञानगंगा माध्यमिक विद्यालय, रत्नागिरी**

**वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम २०२१–२२**

– प्रमुख पाहुणे –
श्री. महेश सकपाळ
– अध्यक्ष –
श्री. संजय देशमुख

दिनांक
२२ डिसेंबर

वेळ
संध्याकाळी ४ वा.

सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

स्थळ – शाळेचे पटांगण

मुख्याध्यापक

- **पारितोषिकप्राप्त मित्राच्या आनंदात सहभागी होण्यासाठी तुम्ही शालेय वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमास उपस्थित राहिला होतात, अशी कल्पना करा व त्या प्रसंगाचे लेखन करा.**

### (२) आत्मकथन–

**आत्मकथन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार करणे.
(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोग, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.
(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे. (परकाया प्रवेश)
(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रीतीने कल्पना मांडणे.
(५) संपूर्ण लेखन प्रथमपुरुषी एकवचनी भाषेत करणे.

**नमुना कृती**



### (३) वैचारिक–

**वैचारिक लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) या निबंध प्रकारात विचारांना प्राधान्य असते.
(२) विचाराला दोन बाजू असू शकतात.
(३) योग्य/अयोग्य दोन्ही बाजूंची साधक-बाधक चर्चा व्हावी.
(४) मुद्द्यांची मांडणी सुसंगत व तार्किक विचारांनुसार असावी.
(५) मुद्द्यांचे समर्थन करण्यास नामवंत विचारवंतांचे विचार, म्हणी, सुवचने यांचा आधार घ्यावा.

(टीप - वाचन, निरीक्षण, चिकित्सक विचार हे वैचारिक मांडणीसाठी आवश्यक आहे.)

**नमुना कृती**



## हे शब्द असेच लिहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रसिद्ध | सहानुभूती | वैयक्तिक | जीवनशैली | भाषातज्ज्ञ | अभिव्यक्ती | विश्वकोश | दैनंदिनी |
| वैशिष्ट्य | साहाय्यक | वैश्विक | विपरीत | मुहूर्त | जीवनध्येय | मैत्रीण | निष्क्रिय |
| महत्त्व | शिरोधार्य | संस्कृती | तीर्थरूप | दृष्टी | कनिष्ठ | मैत्रिणीस | पारंपरिक |
| व्यक्तिमत्त्व | निर्णय | सांस्कृतिक | दुष्काळ | दृष्टिकोन | सर्वांगीण | हार्दिक | पुरस्कार |



## काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) ययाती- वि. स. खांडेकर
(२) बनगरवाडी- व्यंकटेश माडगूळकर
(३) झोंबी- आनंद यादव
(४) ऊन- शंकर पाटील
(५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर- शंकरराव खरात
(६) वपूर्झा- व. पु. काळे
(७) कोसला- भालचंद्र नेमाडे
(८) ग्रामगीता- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
(९) गोष्टी माणसांच्या- सुधा मूर्ती
(१०) मराठी व्युत्पत्ति कोश- कृ. पां. कुलकर्णी
(११) कऱ्हेचे पाणी- प्र. के. अत्रे
(१२) मृत्युंजय- शिवाजी सावंत
(१३) फकिरा- अण्णाभाऊ साठे
(१४) वाचू आनंदे भाग १ ते ४- माधुरी पुरंदरे
(१५) लिहावे नेटके भाग १ ते ३- माधुरी पुरंदरे
(१६) सुगम मराठी व्याकरण व लेखन- मो. रा. वाळंबे



## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स

https://mr.wikipedia.org/wiki/पु.ल._देशपांडे
https://mr.wikipedia.org/wiki/नारायण_सुर्वे
https://mr.wikipedia.org/wiki/रघुनाथ_अनंत_माशेलकर
https://mr.wikipedia.org/wiki/रवींद्रनाथ_ठाकूर
https://mr.wikipedia.org/wiki/इंदिरा_संत
https://en.wikipedia.org/wiki/Chandu_Borde
https://youtu.be/nSmVnQBHQkY
https://youtu.be/E-E5jd4brXU

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेल्या पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.